**महाराष्ट्र शासन**
**परिवहन आयुक्त कार्यालय**
**५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २,**
**महात्मा गांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१.**

**दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२०८२७१०३** **ई-मेल आयडी :-** dycommr.inspect@gmail.com

**क्र: पआका/रवका/सोयीसुविधा /का-१०/२०२२/जा.क्र.-** ११८१ **दिनांक:-** 28 JAN 2022

**प्रति,**
**परिवहन उप आयुक्त (संगणक),**
परिवहन आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:-** कार्यालयातील इलेक्ट्रीकल साहित्य किरकोळ दुरूस्तीबाबत.

परिवहन आयुक्त कार्यालयातील अधिकारी यांच्या दालनातील तसेच विविध कार्यासनातील इलेक्ट्रीकल साहित्यास (एलईडी लाईट, पंखे, इंटरनेट केबल इ.) दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. त्यामुळे ते नादुरूस्त झालेले आहे. याकरिता परिवहन आयुक्त कार्यालयातील अधिकारी दालन व विविध कार्यासनातील नादुरूस्त इलेक्ट्रीकल साहित्य तसेच इतर किरकोळ विद्युत दुरूस्तीची कामे करणे आवश्यक आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, पत्रासोबत जोडण्यात येत असलेले प्रसिद्धीपत्रक दि. ३१/०१/२०२२ रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात यावे.

**सहपत्र:-** वरिलप्रमाणे

**(दिनकर मनवर)**
**परिवहन उप आयुक्त (निरीक्षण)**
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:-** कार्यालयातील इलेक्ट्रीकल साहित्य
किरकोळ दुरूस्तीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**परिवहन आयुक्त कार्यालय**
**५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २,**
**महात्मा गांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१.**

**दुरध्वनी क्रमांक :-** ०२२-२०८२७१०३ **ई-मेल आयडी :-** dycommr.inspect@gmail.com

**क्र: पआका/रवका/सोयीसुविधा /का-१०/२०२२/जा.क्र.-** 1180 **दिनांक:-** 28 JAN 2022

## प्रसिध्दीपत्रक

परिवहन आयुक्त कार्यालय माहे ऑक्टोबर २०१९ पासून फाऊंटन टेलिकॉम भवन-१ व २, फोर्ट, मुंबई येथे अनुक्रमे ७ वा मजला आणि ५ वा मजल्यावर कार्यान्वित आहे. कार्यालयातील अधिकारी यांच्या दालनातील तसेच विविध कार्यासनातील इलेक्ट्रीकल साहित्यास दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. त्यामुळे ते नादुरूस्त झालेले आहे.

याकरिता परिवहन आयुक्त कार्यालयातील अधिकारी दालन व विविध कार्यासनातील नादुरूस्त इलेक्ट्रीकल साहित्य तसेच इतर किरकोळ विद्युत दुरूस्तीची कामे करावयाची आहेत त्याचा तपशील तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | एलईडी लाईट ३६ वॅट (साईज चौकोनी २x२) | १९ |
| २ | एलईडी लाईट १५ वॅट(साईज गोल १x१) | १७ |
| ३ | इंटरनेट पॉइंट | ०५ |
| ४ | इलेक्ट्रीक पॉईंट | ०२ |

उपरोक्त इलेक्ट्रीकल साहित्य दुरूस्तीबाबत विविध निविदाधारकांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रकाबाबत अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

१) उपरोक्त कामासाठी लागणारे साहित्य, मनुष्यबळ इत्यादी निवड केलेल्या पुरवठादारास स्वत: पुरवावे लागेल.
२) प्रत्येक पुरवठादार यांनी एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे. एखाद्या पुरवठादादरराने एकापेक्षा जास्त सादर केल्यास त्यांचे कोणतेच दरपत्रक विचारात घेण्यात येणार नाही.
३) दरपत्रकात नमुद केलेली सर्व कामे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासुन एक आठवडयात पूर्ण करणे बंधनकारक आहे. अन्यथा १०% रक्कम देयकातून वजा करण्यात येईल.
४) साहित्याचा दर्जा ISI ट्रेडमार्क प्रमाणित असावा
५) जो पुरवठादार सर्व अटी व शर्तीची पूर्तता करत आहे व त्यांनी सर्वात कमी दर सादर केला आहे त्यास पुरवठा आदेश देण्यात येईल.
६) दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधकारक आहे.
७) मोहोरबंद लिफाफ्यावर "कार्यालयातील इलेक्ट्रीकल साहित्य किरकोळ दुरूस्ती करणेबाबत दरपत्रक" असे लिहीणे आवश्यक आहे.

उपरोक्त अटी व शर्तीस अनुसरून विहीत नमुण्यातील दरपत्रक मंगळवार दिनांक १५/०२/२०२२ रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्ट्या सोडून) मोहोरबंद लिफाफ्यात परिवहन उपायुक्त (निरीक्षण) यांच्या नावे परिवहन आयुक्त कार्यालय, ५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २, फाऊंटन, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे पाठवावे किंवा प्रत्यक्ष जमा करावेत. मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**(मा. परिवहन आयुक्त यांच्या मान्यतेने)**

-स्वाक्षरी-

**(दिनकर मनवर)**
**परिवहन उप आयुक्त (निरीक्षण)**
महाराष्ट्र राज्य, मुंबई.